नियमीत दिवाणी दावा क्र. ४४/२०१८
केशरबाई वि. वैशाली व ईतर

**अर्ज निशाणी क्रमांक ७३ खालील आदेश.**

प्रस्तूतचा अर्ज वादीने ***दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७*** अनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२**. वादीने अर्जात असे कथन केले आहे की, वादीने वाटणी व स्वतंत्र ताबा मिळणेबाबतचा दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याची प्रत दाखल केल्यानंतर वादीला अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे काही दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्यानुसार, सदर दाव्यात प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याचा अर्ज वादींनी दाखल केलेला आहे.

**०३**. प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनही त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. सबब सदरचा अर्ज प्रतिवादींच्या 'म्हणणेविना' चालविण्यात आला.

**०४**. अभिलेखाचे अवलोकन केले. वादींतर्फे युक्तिवाद ऐकला.

**०५**. वादीने सदरचा दावा हा वाटणी व स्वतंत्र ताबा मिळणेबाबतचा असल्याने सदर अर्जात नमुद केलेली दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेशः–

**आदेश**

१. वादींचा **नि.क्र.७३** वरील अर्ज रक्कम रु.३००/– (अक्षरी तिनशे रुपये फक्त) च्या खर्चावर मंजूर करण्यात येतो.

२. वादीने वादपत्रात १४ दिवसांच्या आत प्रस्तावीत दुरुस्ती पुढील तारखेला किंवा त्या अगोदर करुन वादपत्राची एकत्रीत प्रत व हुकूमनाम्यासाठी वादपत्राची दुय्यम प्रत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.04.10 17:11:45 +0530

**(श्री. आवटे पी. पी. )**

दिनांक :– १०/०४/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.